| MHST080007022014 | रे. दि. मु. क्रमांक १७८/२०१४ मधील नि. क्र. २८ खालील आदेश. |
|---|---|
| | श्री. दादा बाजीराव धायगुडे विरुध्द श्री. जयसिंग नामदेव धायगुडे |

**(आदेश पारित दिनांक ०७.०३.२०२५)**

सदरचा अर्ज वादी यांनी दावा दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे.

०२. वादीनुसार, वादीने सदरचा दावा वादी हा दावा मिळकतीचे मालक आहेत असे जाहीर ठराव होऊन मिळणेकरिता, तसेच वादीच्या दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांन स्वतः अगर एजंट अथवा नातेवाईक मार्फत कोणत्याही प्रकारे कसल्याही स्वरुपाचा कोणत्याही मार्गाने हरकत अडथळा करु नये अशी निरंतरची ताकिद प्रतिवादीचे विरुद्ध बहाल करणेत यावी, तसेच दाव्याचा अंतीम निकाल होण्यास बराच कालावधी लागणार असल्याने तद्अनुशंगीक दाद म्हणून वादीच्या दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी स्वतः अगर नातेवाईकांमार्फत कोणत्याही प्रकारे कसल्याही स्वरुपाचा कोणत्याही मार्गाने हरकत अडथळा करु नये, अशी तुर्तातुर्त ताकिद वादीस प्रतिवादीचे विरुद्ध बहाल करणेत यावी, याकरिता दाखल केलेला आहे. शंकर दगडू धायगुडे मयत झाल्यानंतर अर्जात नमूद वारसांची नावे ७/१२ उता-यावर लागल्याचे त्यांना समजले. त्यांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. अर्जात नमूद प्रतिवादी नंबर १३ ते १८ आकडा टाकून अर्जात नमूद वारसांना दाव्यात सामील करण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज गुणवत्तेवर निकाली काढण्यात येत आहे.

०४. सदरचा अर्ज व दाव्याचे अवलोकन केले. सदरची दुरुस्ती ही नावासंदर्भातील आहे. दाव्यातील प्रार्थना व सद्य परिस्थिती पाहता, अर्जातील नमूद केलेल्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार नाही, याउलट दावा गुणवत्तेवर काढण्यात मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची

आहे. एकूणच सर्व परिस्थितीचा विचार करता, सदरची दुरुस्ती न्यायाच्या दृष्टीने योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये नमूद केलेली दुरुस्ती विहीत कालावधीमध्ये करावी व त्याप्रमाणे दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करणेत यावी. |
| ३. | सदर आदेशाची दोन्ही पक्षांनी नोंद घ्यावी. |
| ४. | खर्चाबाबत आदेश नाही. |

PATTEBAHADUR KARUNA

Digitally signed by PATTEBAHADUR KARUNA
Date: 2025.03.11 10:47:54 +0530

(के. ए. पट्टेबहादुर)

दिनांकः– ०७.०३.२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, खंडाळा.

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे–

न्यायालयाचे नाव : सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खंडाळा.

लघुलेखकाचे नाव : सौ. सुवर्णा संकेत शिंदे.

(एस.एस.शिंदे)

लघुलेखक